# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट १९-२३ दिनांक : १८/०१/२०२२

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान सन २०२३ चा सांगता समारोह संपन्न.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये होणारे रस्ता अपघात कसे टाळावेत याबाबत जनजागृती करणे तसेच वाहतुक नियमांचे नागरिकांनी पालन करावे हा मुख्य उद्देश समोर ठेवून दिनांक ११/०१/२०२३ ते दिनांक १७/०१/२०२३ या कालावधीत वाहतुक शाखा काशिमिरा, वसई, विरार विभाग यांचेवतीने महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२३ राबविण्यात आले. सदर कार्यक्रमाची सांगता दिनांक १७/०१/२०२३ रोजी विश्वकर्मा हॉल, विर सावरकर नगर, अंबाडी नाका, वसई पश्चिम येथे पार पडली.

प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर करताना रस्ते अपघाताची माहिती देवून रस्ते अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. तदनंतर श्री. फेलीक्स मच्याडो (बिशप) यांनी शहरवासीयांना वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत संदेश दिला. या प्रसंगी मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय यांनी उपस्थित अधिकारी/अंमलदार, वाहन चालक/मालक संघटनेचे पदाधिकारी तसेच सर्वसामान्य नागरिक यांना वाहतुकीचे नियम पाळण्यासह पोलीसांना आपलाच मित्र मानून सहकार्य करण्याबाबत आवाहन केले. उपस्थितांना सायबर गुन्हयांबाबतची माहिती देवुन त्यापासुन होणारी फसवणुक कशी टाळावी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच नागरिकांकडून प्राप्त तक्रारीचे निवारण लवकरात लवकर होणेकरीता दर शनिवारी पहिल्या सत्रात तक्रार निवारण दिन साजरा करण्याबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचित केले. नागरिकांकडून कार्यक्रमास उस्फुर्तपणे प्रतिसाद मिळाला.

सदर कार्यक्रमास श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ तथा अति. कार्यभार परिमंडळ २, श्री. कैलास चव्हाण, सहायक पोलीस आयुक्त, वाहतुक विभाग, श्रीमती पद्‌मजा बडे, सहायक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा अति. कार्यभार वसई विभाग, फेलीक्स मच्याडो (बिशप) व इतर अधिकारी/ अंमलदार तसेच नागरिक उपस्थित होते.


वाहतुक शाखा वसई-काशिमीरा-विरार, परिमंडळ १,२,३
।। सांगता समारंभ ।।
रस्ता सुरक्षा अभियान २०२३
Metro City Samachar
Jan 17, 2023, 18:32

-----oooo-----